दैनिक अन्यायाचा प्रतिकार **रायगड नगरी** महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

• वर्ष १६ वे • अंक ८३ • MAHMAR/2006/17212 • रायगड • बुधवार दि.१६ जून २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# दि.बा.पाटीलांच्या स्मृतिदिनी २४ जूनला सिडकोला घेराव

## किमान एक लाखाचा घेराव ; आंदोलनाची जय्यत तयारी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्यासाठी १० जूनला झालेल्या जोरदार आणि यशस्वी मानवी साखळीच्या आंदोलनानंतर आता २४ जूनच्या आंदोलनाची जय्यत तयारी सुरू झाली आहे. आणि त्या अनुषंगाने या आंदोलनात किमान ०१ लाख लोकांचा सहभाग असणार असून त्यावेळेस पुढील आंदोलनाचीही घोषणा करण्यात येणार आहे, असे आज (दि. १५) पनेवलमध्ये झालेल्या बैठकीतून स्पष्ट झाले.

आगरी समाज हॉल येथे झालेल्या रायगड व नवी मुंबई विभागाच्या बैठकीस नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथदादा पाटील, उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, समितीचे कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, कॉ.भूषण पाटील, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा परिषेदचे माजी अध्यक्ष सुरेश टोकरे, जे. डी. तांडेल, दीपक म्हात्रे, दीपक पाटील, रुपेश धुमाळ, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष के. के. म्हात्रे, दशरथ भगत, नंदराज मुंगाजी, साई संस्थानचे विश्वस्त रवी पाटील, नगरसेवक मनोज भुजबळ, डॉ. अरुणकुमार भगत, विकास घरत, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, राज पाटील, माजी नगरसेवक गुरुनाथ गायकर, जयेश आकरे, धीरज कालेकर, राजेश गायकर, सीमा घरत, भाजपचे दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष महेश मोहिते, युवा नेते राजेश मपारा, रोहा तालुकाध्यक्ष सोपान जांभेकर, तसेच विविध संस्था, संघटनांचे प्रतिनिधी, आणि विविध पक्षांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे नेते स्व. दि. बा. पाटील यांचे नाव देण्यासंदर्भात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीने लढा उभारला आहे.त्यांना प्रकल्पग्रस्त तसेच सामाजिक संस्था, संघटना, राजकीय पक्षांनी पाठिंबा देत आंदोलनात सहभाग घेतला. १० जूनला रायगड ते नवी मुंबई, ठाणे, पालघर, कल्याण, डोंबिवली, बदलापूर, अंबरनाथ, ते मुंबई असा 'भूतो न भविष्यतो' मानवी साखळी आंदोलन भव्य स्वरूपात झाले. याची दखल संपूर्ण महाराष्ट्रांनीच नाही तर देशाने घेतली. या आंदोलनाच्या नंतर लोकनेते दि. बा. पाटील यांच्या स्मृतिदिनी २४ जूनला सिडकोला घेराव घालण्याचे नियोजन जोरात सुरु आहे. त्या अनुषंगाने आजच्या बैठकीत आंदोलनांच्या नियोजनासंदर्भात सखोल चर्चा झाली. यामध्ये भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्त, स्थानिक, कृती समिती, संस्था संघटना, विविध राजकीय पक्षाचे गाव ते शहरातील किमान ०१ लाख जणांचा समावेश असणार आहे. आणि तशी जय्यत तयारी आहे.

१० जूनच्या आंदोलनाने फक्त दि. बा. पाटील यांचेच नाव पाहिजे हा संदेश देशभर पोहोचविला आहे. आंदोलनात कोणत्याही पक्षाचा झेंडा नव्हता फक्त दिबांसाहेब हाच ध्यास होता. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सारखी मंडळी पाठीशी आहेत, त्यामुळे या लढ्याला ताकद मिळाली आहे. आम्हाला कुठेही नको विमानतळालाच दिबांचे नाव पाहिजे हि भूमिका आम्ही मुख्यमंत्र्यांसमोर ठाम मांडली आहे. मी शिवसेनेचा उपनेता आहे पण दिबांसाठी आमचा संघर्ष कायम राहणार आहे. विरोधक आता अफवा पिकवण्याचे काम करत आहे त्यामुळे कृपा करून कुणीही समाजात तेढ निर्माण करू नये.

**- दशरथदादा पाटील**

### २४ तारखेचे आंदोलन शेवटचे नाही यापेक्षा प्रखर आंदोलने केले जातील : आ.प्रशांत ठाकूर

लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव विमानतळाला द्यावे यासाठी आता २००८ साली मागणी झाल्याचे समोर आले असल्याचे त्यांनी सांगितले. विमानतळाचे काम अद्यापही पूर्णत्वास आले नसल्याने साहजिकच नामांतराचा विषय नव्हताच. परंतु अचानकपणे ना. एकनाथ शिंदे यांची मागणी आणि सिडकोच्या ठरावाने भूमिपुत्राला दुखावले. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी चर्चेला कृती समितीला बोलावले तसेच महाविकास आघाडीच्या स्थानिक पुढाऱ्यांना पाचारण केले. त्या बैठकीत कृती समितीने ठामपणे दिबासाहेबांचेच नाव पाहिजे हि भूमिका मांडली मात्र आता महाविकास आघाडीच्या पुढाऱ्यांनी लोकांमध्ये संभ्रम सुरु केला आहे. असे असले तरी दिबांच्या नावाला दुसरा पर्याय नाही हे आम्ही ठामपणे सांगितले आहे. विरोध दिबासाहेबांच्या नावाला आहे, तो विरोध सहन करायचा नाही. २४ जूनला घेरावाच्या पार्श्वभूमीवर आपल्यावर केसेस करतील. दिबासाहेबांना सीमेवरील आंदोलनात एक वर्षाची जेल झाली तर आम्ही केसेस कारवाईसाठी का घाबरावे असे सांगतानाच २४ तारखेचे आंदोलन शेवटचे नाही तर यापुढे या पेक्षा प्रखर आंदोलने केले जातील.

### विमानतळाला दिबासाहेबांचेच नाव द्यावे : रामशेठ ठाकूर

दि. बा. पाटील साहेबांचे नाव नवी मुंबई विमानतळाला द्यावे हि पहिल्यापासूनच सर्वांची मागणी आहे. या संदर्भात भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्त, ग्रामपंचायती, संस्था, संघटनांनीही मागणी केली आहे. या अनेक मागण्या असताना नामदार एकनाथ शिंदे यांची एक मागणी येते आणि लगेच ठराव घेतला जातो, हि कुठली नीती आहे. भाजपचे खासदार मनोज कोटक यांनी घाटकोपर-मानखुर्द लिंक उड्डाणपूलला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव देण्याची आधी मागणी केली तरी शिवसेनेचे खासदार यांनी नंतर सुफी संत सुल्तानूल हिंद ख्वाजा गरीब नवाज यांचे नाव देण्याची मागणी केली यात किती फरक आहे बघा. त्यानंतर राहुल शेवाळेंनी ती मागणी मागे घेतली त्याचप्रमाणे ना. एकनाथ शिंदेंनी दिबांच्या नावाच्या सर्वप्रथम मागणीचा मान ठेवून आपले मन मोठे करावे, आणि विमानतळाला दिबासाहेबांचेच नाव द्यावे, असे यावेळी नमूद केले. १० जूनला आंदोलनाची पहिली पायरी यशस्वी झाली. २४ जूनला सिडकोला घेराव आणि त्यानंतरही दिबांच्या नावासाठी टप्प्याटप्प्याने संघर्ष तीव्र करत राहू. २४ जूनच्या घेराव आंदोलनात पुढील आंदोलनाची घोषणा केली जाईल.

---

## संक्षिप्त...

### गाडीवर गोळ्या झाडून दोघेजण पसार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पैसे जबरदस्तीने चोरी करण्याच्या उद्देशाने दोघा जणांनी मारुती सुझुकी गाडीवर बंदुकीने गोळ्या झाडून तसेच सदर गाडीच्या काचा फोडून त्याच्याकडील पैसे जबरीने चोरण्याचा प्रयत्न करून पसार झाल्याची घटना पनवेल जवळील पुष्पकनगरजवळ घडली आहे. सुनील गाडेकर (३६) हे त्यांच्या मारुती सुझुकी गाडी क्र.एमएच-०१-एई-९४०३ ही सोबत घेवून असताना दोन अज्ञात इसम मोटार सायकलवरुन आले. त्यातील एकाची उंची ५ फूट ५ इंच, डोक्यात निळ्या राखाडी रंगाची मंकी कॅप, डोळे लालसर, काळ्या रंगाचा हाफ रेशनकोट तर मोटार सायकलच्या पाठीमागे बसलेल्या इसमाने त्यांना धमकावून पैशाची मागणी करून त्यांच्या गाडीवर बंदुकीच्या गोळ्या झाडल्या. त्याची उंची अंदाजे ५ फूट ८ इंच, डोक्यात लाल पिवळ्या रंगाची मंकी कॅप, त्याच्या कपाळावर पक्षाचे निशाण, डोळे लालसर व त्याने काळ्या रंगाचा हाफ रेनकोट घातला आहे.

**प्राईम लोकेशनला गाळा विकणे आहे**

पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५० बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.

संपर्क : ९८२०३५५३४६

**ए.टी.एम.साठी जागा भाड्याने देणे आहे**

पवन अपार्टमेंट येथील लोखंडीपाडा, नवीन जिल्हा सत्र न्यायालयासमोरील जागा बँकेच्या ए.टी.एम.साठी जागा भाड्याने देणे आहे.

संपर्क : ९२२३३४५२४९

## पुढारी, नगरसेवक नाही कामाचे, पत्रकार आहेत जनतेच्या विकासाचे



**दै.रायगड नगरी । संजय रिकामे**

**तळा** : पावसाळा आला की रस्ते खड्ड्यांत जातात आणि चर्चेला उधाण येते. रस्त्यांची दुर्दशा ही एक गंभीर समस्या आहे यात वादच नाही कारण त्यामुळे केवळ अप-घातच होत नाहीत, तर रहदारी अडल्यामुळे वाहतूक मंदावते व प्रचंड वेळ वाया जातो. सध्या पावसामुळे तळा तालुक्यातील नव्याने बांधण्यात आलेल्या ग्रामीण रुग्णालयाकडे जाणाऱ्या रस्त्याची दुर्दशा झालेली आहे. तळा नगरपंचायतील नागरिकांची अपेक्षा खुप छोट्या आहेत. त्या म्हणजे तेथील नगरसेवक आणि पुढारी यांनी प्रशासनास कामाला लावुन नागरिकांना उत्तम सेवा द्यावी परंतु एकही नगरसेवक आणि पुढारी या रस्त्याचे काम नगरपंचायतीकडुन पुर्ण करुन करण्यासाठी पुढे येत नाही. शहराची अवस्था बकाल झाली आहे. प्रभागातील नागरिकांना मुलभुत सुविधा देण्यासाठीच नगरसेवक, पुढारी आणि प्रशासन कमी पडत आहेत.

वर्षानुवर्षे कोणत्याही नगरसेवकाला आणि पुढारयाला जमलं नाही ते मात्र पत्रकारांनी कमी वेळेत करुन दाखवलं आहे. या रस्त्याची डागडुजी होण्यासाठी तळा तालुका तालुक्यातील स्थानिक पत्रकारांनी दैनिक रायगड नगरीचे संपादक सुनिल पोतदार यांच्याकडे वारंवार संपर्क साधला होता. स्थानिक पत्रकारांना या रस्त्याची दुरुस्ती करण्याचे आश्वासन पोतदार यांनी दिले होते त्या अनुषंगाने त्यांनी नगरपंचायत प्रशासनास जाब विचारुन हे काम सुरु करण्यास भाग पाडले आहे. दोन दिवसात या कामाची डागडुजी करण्यात आली आणि तो नागरिकांसाठी खुला करण्यात आला आहे. याचा अर्थ असा की नगरपंचायत प्रशासन आणि नगरसेवक यांचा अभूतपूर्व विसंवाद आहे.

सर्वच बाबतीत ढिलाई आहे. बिनकामाचे नगरसेवक आणि पुढारी यांना कायमचे घरी बसविण्याची वेळ आता आली आहे, बकाल होत चाललेल्या शहराच्या प्रगतीसाठी पुढारी उत्तरे शोधणार आहात की नाही? असा संतप्त सवाल आता तळेवासी करत आहेत. नगरपंचायत प्रशासनास या रस्त्याचे काम पुर्ण करण्यासाठी पाठपुरावा करणारे स्थानिक पत्रकार आणि दैनिक रायगड नगरीचे संपादक सुनिल पोतदार यांचे आभार तळेवासीयांनी मानले आहेत.

## उरण-करंजा खड्डेमय रस्ता तात्काळ दुरुस्ती करण्याची मागणी



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण - करंजा रहदारीचा रस्ता खड्डेमय झाला आहे. तर रस्त्याला ठिक ठिकाणी भगदाडे पडली असून, यामुळे या खड्डेमय रस्त्यावर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र याकडे गंभीर समस्येकडे बांधकाम खात्याचे अधिकारी जाणून बुजून दुर्लक्ष करीत असल्याने प्रवाशी जनतेत संताप व्यक्त करण्यात येत आहे.

पूर्वी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अखत्यारीत असणारा, आत्ता जिल्हापरिषदकडे असणारा करंजा-उरण रस्ता हा मोठ्या रहदारीचा आहे.चाणजे ग्रामपंचायत मधील असणाऱ्या गावातील लोकांचा उरण बाजारासाठी वावर याच रस्त्यातून होत आहे. उरणहुन अलिबाग आणि अलिबागहुन उरण याच मार्गातून प्रवासी दैनंदिन प्रवास करीत आहेत. या मार्गातून प्रवास करीत असताना खड्डेमय रस्त्यातून प्रवास करावा लागत आहे.

पूर्वी सार्वजनिक बांधकाम खात्याकडे हा रस्ता होता त्यानंतर हा रस्ता जिल्हापरिषद कडे वर्ग करण्यात आला आहे. मध्यंतरी या रस्त्याच्या डागडुजीसाठी सिडकोने निधी उपलब्ध करून हा .../२

## खोपोली येथे अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ञ कोविड हेल्थ सेंटरचे पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते उद्‌घाटन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

खालापूर तालुक्यातील खोपोली के.एम.सी कॉलेज येथे अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ञ कोविड हेल्थ सेंटरचे पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांच्या हस्ते आणि खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेंद्र थोरवे यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्धाटन संपन्न झाले.



यावेळी अलिबाग नगरपरिषदेच्या नगरसेविका श्रीमती चित्रलेखा पाटील, जिल्हा नियोजन मंडळाचे सदस्य नवीन घटवाल, खोपोलीच्या नगराध्यक्षा सुमनताई औसरमल, उपनगराध्यक्षा विनिता औटी- कांबळे, पंचायत समितीच्या सभापती सौ. अर्चना पाटील, खोपोलीचे माजी नगराध्यक्ष दत्ताजीराव मसूरकर, माजी नगराध्यक्ष सुनील पाटील, अंकीत साखरे, उपविभागीय अधिकारी वैशाली ठाकूर-परदेशी, तहसिलदार ईरेश चप्पलवार, नगरपालिका मुख्याधिकारी गणेश शेटे, नगरपालिका दवाखाना वैद्यकीय अधिकारी डॉ. संगिता ठाकूर-वानखेडे, नगरसेवक अमोल जाधव, काशिनाथ गायकवाड, माधुरी रिठे, जिनी सॅम्युअल, केविना गायकवाड, लिलाबाई धुमणे, निकिता पवार, निर्मला शेलार, विकास खुरपुडे, श्री.चूरी, श्री.गुप्ता, एकनाथ पिंगळे, ॲड. येरुणकर, नरेंद्र गायकवाड, गगणगिरी ट्रस्टचे श्री.माने, श्री.शिवाजी पाटणकर, कोविड हॉस्पिटलचे .../२

## सिडकोच्या नैना प्रकल्पाच्या परियोजनांची जलद गतीने अंमलबजावणी

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सिडको महामंडळातर्फे नवी मुंबई विमानतळाभोवतालच्या ३७१ चौ.कि.मी. च्या प्रदेशात साकारण्यात येत असलेल्या, नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र अर्थात नैना प्रकल्पाची अंमलबजावणी जलद गतीने होत असून प्रकल्पाकरिता प्रस्तावित ११ नगर रचना योजनांपैकी क्र. १ ते ३ या योजनांवर विविध स्तरांवर कार्यावाही सुरू आहे. तर योजना क्र. ४ ते ११ या जमीन मालकांच्या मागणीच्या प्राधान्याप्रमाणे राबविण्याकरिता संबंधित जमीन मालकांना संमतीपत्र सादर करण्याचे आवाहनही सिडकोकडून करण्यात आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमातळाभोवतालच्या प्रदेशाची होणारी संभाव्य अनिर्बंध वाढ रोखण्यासाठी रायगड जिल्ह्यातील १७५ गावांतील मिळून ३७१ चौ.कि.मी. क्षेत्राच्या प्रदेशात सिडकोतर्फे नैना हे पर्यावरणपूरक विकासावर आधारित, निवासी, वाणिज्यिक, शैक्षणिक इ. सोयी सुविधांनी परिपूर्ण असे अत्याधुनिक व सुनियोजित शहर विकसित करण्यात येत आहे. या प्रकल्पाकरिता सिडको मध्यस्थ/समन्वयक (Facilitator) म्हणून भूमिका बजावित आहे.

नैना नगर रचना परियोजनांची अंमलबजावणी जलद गतीने व अत्यंत पारदर्शकरीत्या व्हावी यावर सिडकोचा कटाक्ष आहे. जमीन मालकांच्या सहभागातून व सहाकार्यातून साकारण्यात येणारा हा प्रकल्प नगर विकास क्षेत्रातील एक आगळावेगळा प्रकल्प ठरणार आहे.

**डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

स्वातंत्र्यपूर्व काळापासून नगर रचना परियोजनांद्वारे शहरांचा विकास साधण्याच्या बाबतीत महाराष्ट्र हे अग्रणी राज्य आहे, म्हणून अधिक जलद व प्रभावी अंमलबजावणी व्हावी याकरिता, नैना प्रकल्पाची .../२

# भाडेत्वावर घेतलेली कार परस्पर दुसऱ्याला विकणाऱ्या व्यक्तीचा कळंबोली पोलसांकडून शोध सुरु

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोलीत राहणाऱ्या ओमप्रकाश उपाध्याय नामक व्यक्तीने प्राईम मुवर मोबॅलिटी टेक्नॉलजिस प्रा.लि. या कंपनीकडून २१ लाख रुपये किंमतीची इनोव्हा क्रिस्टा कार एक वर्षाच्या भाडेतत्वावर घेऊन कंपनीला कारचे भाडे न देता, सदर कार परस्पर दुसऱ्या व्यक्तीला विकल्याचा प्रकार उघडकिस आला आहे. तसेच दुसऱ्या व्यक्तीने देखील ती कार तिसऱ्या व्यक्तीला विकल्याचे उघडकिस आले आहे. त्यामुळे कळंबोली पोलिसांनी या प्रकरणात ओमप्रकाश उपाध्याय याच्यावर फसवणुकिचा गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

या प्रकरणातील आरोपी ओमप्रकाश उपाध्याय याने गत डिसेंबर महिन्यामध्ये भाडेतत्वावर कार देणाऱ्या प्राईम मुवर मोबॅलिटी टेक्नॉलजिस प्रा.लि. कंपनीला संपर्क साधुन १ वर्षाच्या भाडेत्वावर इनोव्हा क्रिस्टा कारची मागणी केली होती. सदर कंपनीने ४६,७२० रुपये महिना भाडेतत्वावर सदरची कार उपाध्याय याला कळंबोली येथे नेऊन दिली होती. त्यावेळी कंपनीच्या प्रतिनिधीने उपाध्याय याच्या कागदपत्रांची खातरजमा करुन करार पत्रावर त्याच्या सह्या घेतल्या होत्या. सदर कार घेतल्यानंतर उपाध्याय याने सुरुवातीचे दोन महिन्याचे कारचे भाडे कंपनीला पाठवून दिले. मात्र त्यानंतर त्याने कारचे भाडे देणे बंद केले. त्यामुळे कंपनीच्या वसुली अधिकाऱ्यांनी उपाध्याय याच्याकडे कारबाबत चौकशी केली असता, त्याने सदरची कार राजेशकुमार सामंतराय याला भाडेतत्वावर दिल्याचे सांगितले.

त्यानंतर कंपनीच्या वसुली अधिकाऱ्यांनी त्यांच्या कारचा शोध घेतला असता, त्यांची कार सांगली येथील कुमार सावंत याच्याकडे असल्याचे त्यांना समजले. तसेच त्याला राजेशकुमार याने सदरची कार विकल्याची माहिती मिळाली. दरम्यान, ओमप्रकाश उपाध्याय याने भाडे तत्वावर घेतलेल्या कारचे महिन्याचे भाडे न भरता २१ लाख रुपये किंमतीची इनोव्हा क्रिस्टा कार त्याने परस्पर दुसऱ्याला विकून कंपनीचा विश्वासघात केल्याचे आढळुन आल्यानंतर कंपनीच्या वसुली अधिकाऱ्यांनी कळंबोली पो-लीस ठाण्यात त्याच्याविरोधात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी उपाध्याय याच्यावर फसवणुकिचा गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.



**शिरढोण येथे नवीन रास्त भाव धान्य दुकानाचे उद्घाटन रास्त भाव धान्य दुकान व किरकोळ रॉकेल विक्रेता वेलफेअर असोसिएशन पनवेल अध्यक्ष तथा शिवसेना पनवेल तालुका संघटक भरत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिरढोण ग्रामपंचायत सरपंच, सदस्य तसेच नंदकुमार पाटील, प्रदीप माळी, जितेंद्र देशमुख, काशिनाथ कातकरी व संबंधित महिला बचत गट, ग्रामस्थ उपस्थित होते.**

# माथेरान शटल ट्रेनच्या फेऱ्यात वाढ करावी : अजय सावंत

**दै.रायगड नगरी । माथेरान**

पर्यटकांचे खास आकर्षण असणाऱ्या मिनिट्रेन शटल सेवेच्या फेऱ्यात वाढ करावी अशी मागणी माजी नगराध्यक्ष अजय सावंत यांनी रेल्वेच्या विभागीय व्यवस्थापक यांच्याकडे केली आहे.

माथेरान मध्ये येणारे बहुतेक सर्वच पर्यटक हे केवळ इथल्या मिनिट्रेनची सफर करण्यासाठी येतात परंतु पावसाळ्यात ही सेवा दरडी कोसळण्याची भीती असल्यामुळे चार महिने बंद करण्यात येते.परंतु काही वर्षापूर्वी इथे अमन लॉज रेल्वे स्टेशन ते माथेरान या अडीच किलोमीटर दरम्यान शटल सेवा सुरू करण्यात आली आहे. सध्या लॉक डाऊन काळात पर्यटकांना बंदी घालण्यात आली आहे त्यामुळे दोन फेऱ्या केल्या जात आहेत. लवकरच लॉक डाऊन शिथिल करण्यात येणार असल्यामुळे इथे पर्यटकांच्या संख्येत भरमसाठ वाढ होणार आहे त्यासाठी पर्यटकांना या ट्रेनची सफर घडावी यासाठी निदान सात ते आठ फेऱ्या या मार्गावर करण्यात याव्यात जेणेकरून येणाऱ्या पर्यटकांचा हिरमोड होणार नाही.



यामुळेच पर्यटकांच्या संख्येत पावसाळ्यात वाढ होऊन सर्वसामान्य लोकांना लॉज, हॉटेल धारकांना,मोलमजुरी करणाऱ्या श्रमिकांना याचा लाभ होऊ शकतो सर्वांच्या उत्पन्नात भर पडू शकते यासाठी रेल्वेच्या विभागीय व्यवस्थापकांनी प्रयत्न करावेत असे कार्यशील विद्यमान माजी नगराध्यक्ष अजय सावंत यांनी मागणी केली आहे. त्यांनी रेल्वेच्या विभागीय व्यवस्थापकांची मुंबई कार्यालयात प्रत्यक्ष भेट घेऊन इथली सर्व परिस्थिती समजावून सांगितली आहे. त्यामुळे निश्चितच यावर निर्णय होऊन या फेऱ्यात वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यावेळी अजय सावंत यांच्या सोबत माजी नगराध्यक्ष विवेक चौधरी आणि अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# एस.टी. च्या रातराणी ठप्पच ; खाजगी ट्रॅव्हल्स मात्र भरलेल्या

**दै.रायगड नगरी । पेण**

प्रवाशांच्या सेवेसाठी असे ब्रीद वाक्य घेऊन मागील अनेक वर्ष प्रवाशांची सेवा करत असलेले एस.टी. महामंडळ कोरोनाच्या विळख्यातून अद्याप सुटलेले नाही. राज्य सरकारने अनेक जिल्ह्यात अनलॉक केले आहे. जिल्हा बंदी उठल्याने प्रवासी वाहतूक देखील सुरू झाली आहे. तरी महामंडळाचे चाक अद्याप रुतलेलेच आहे. अनेक मार्गावर प्रवाशांचा अल्प प्रतिसाद असल्याने या मार्गावरील फेऱ्या अद्याप सुरू करण्यात आलेल्या नाहीत तर दुसरीकडे महामंडळाच्या या उदासिनतेचा फायदा घेत खासगी ट्रॅव्हल्सवाले मात्र सुसाट सुटले आ-हेत. एसटीच्या रातराणी गाड्यांना प्रवासी भेटत नसताना खाजगी ट्रॅव्हल्स भरलेल्या दिसत आहेत.



रायगड जिल्ह्यातील बहुतांशी वाहतूक सेवेचा गाडा हा एसटी महामंडळ अनेक वर्षे ओढत आहे. कोरोना काळात एस.टी.च्या या गाड्याला ब्रेक लागला. जिल्ह्यात आज १५० बसेस तर्फे ६३८ फेऱ्यांद्वारे प्रवासी वाहतूक सुरू आहे. ७५३ वाहक व ७४६ चालक यांच्याद्वारे ही वाहतूक केली जात आहे. मात्र कोरोनाचे संकट पूर्ण संपले नसल्याने प्रवाशांचा प्रतिसाद कमी आहे. वाहतुकी मध्ये उत्पन्नाचे मुख्य स्तोत्र असलेल्या रातराणी गाड्या जवळपास ठप्प आहेत. संपूर्ण जिल्ह्यात मुंबई -दिघी, नालास-ोपारा- श्रीवर्धन व श्रीवर्धन- बोर्ली- नालासोपारा फक्त तीन रातराणी धावत आहेत. प्रवाशांचा प्रतिसाद नसल्याने अन्य रात राणी सुरू केलेल्या नाहीत. महामंडळाच्या रातराणी सेवा जवळपास बंद असल्याने याचा फायदा खाजगी ट्रॅव्हल्स वाले घेत आहेत. जिल्ह्यातील अनेक गावात घरपोच प्रवासी सेवा देण्यात खासगी ट्रॅव्हल्सवाल्यानी बाजी मारली असून यामुळे अव्वाच्या सव्वा भाडे आकारून प्रवाशांची लूट होत आहे.

मुंबईपासून जवळच असलेल्या रायगड जिल्ह्यातील अनेक नागरिक मुंबई, ठाणे, पनवेल, कल्याण आदी परिसरात वास्तव्याला आहेत या प्रवाशांना कामावरून सुटल्यानंतर रात्री गावी येणे सोयीस्कर पडते मात्र जिल्हा अनलॉक होऊन जवळपास पंधरा दिवस होत आले आहेत तरी महामंडळाच्या रातराणी सेवा ठप्प असल्याने त्यांना खासगी ट्रॅव्हल्स आधार घ्यावा लागत आहे.

रायगड परिवहन विभागामार्फत प्रवासी उपलब्धतेच्या अनुषंगाने रातराणीच्या तीन फेऱ्या सुरू आहेत. प्रवाशांच्या उपलब्धता नुसार यामध्ये वाढ करण्यात येणार आहे.
**- अनघा बारटक्के,**
**विभाग नियंत्रक रायगड रा.प.**

# रोह्यात भारतीय मानवाधिकार परिषदेच्या वतीने कोरोना योद्धांचा सत्कार

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

आजारी पडल्यावर देवानंतर आपला विश्वास डॉक्टरांवर असतो. याची प्रचिती अनेकांना आली आहे. आपल्या कुटुंबाची जबाबदारी व सुरक्षितता सांभाळत डॉक्टर, पोलीस, सामाजिक कार्यकर्ते व वेळोवेळी कोरोनाची स्थिती आपल्याला घरबसल्या लक्षात आणून देणारे पत्रकार यांनी अविरत सेवा दिली. अश्या अनेकविध क्षेत्रातील कोरोना योद्ध्यांचा सत्कार होणे आवश्यक असल्याचे लक्षात घेत भारतीय मानवाधिकार संस्थेचे रायगड जिल्हा अध्यक्ष डॉ.अस्लम शेख व त्यांच्या अर्धांगीनी डॉ.सायरा शेख यांनी सत्कार कार्यक्रम आयोजित केला. रविवारी सायंकाळी डॉ. अस्लम शेक यांच्या क्लिनिक मध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी डॉ.ज्ञानेश्वर पाटील, डॉ. सायरा शेख, अँम्बुलँस ड्रायव्हर ललित सदावर्ते, आलशीफा मेडिकल व्यवस्थापक शेफ अली, पोलीस हणमंत धायगुडे,



हवालदार चेरकर, सामाजिक कार्यकर्ते राजेश काफरे, आदित्य कोंडाळकर, सईद जोगिलकर, दिलीप महमुनी, असगर अली खान, समीर दळवी मनसुर नाडकर, ऐजाज वासकर, जावेद नाडकर, पत्रकार रविंद्र कान्हेकर, उद्धव आव्हाड, अक्षय जाधव यांचा सत्कार रायगड जिल्हा मानवाधिकार संस्थेचे अध्यक्ष डॉ. अस्लम शेख व माझे कोंकण चनलचे उपसंपादक सिद्धेश शिगवण यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बोलताना सिद्धेश शिगवण म्हणाले कि, आज आपला देश कोरोना महामारिशी लढत आहे. या लढ्यात डॉक्टर, पोलीस व सामाजिक कार्यकर्त्यांनी लोकांना वाचविण्यासाठी आतोनात प्रयत्न केले. अश्या नागरीकांचा सत्कार होणे आवश्यक आहे. अश्या परिस्थितीत रोह्यातील नामवंत डॉक्टर डॉ.अस्लम शेख यांची या कोरोना योद्ध्यांचा सत्कार केला. त्यामुळे डॉक्टर अस्लम शेख यांचे रोहा तालुक्यात सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

# कॉ.जी.एल.पाटील यांचा स्मृतीदिन संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

अखिल आगरी परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कामगार नेते आदरणीय कॉ.जी.एल. पाटील यांचा स्मृतीदिन उरण नगर परिषद शाळेच्या प्रांगणातील कॉ जी एल पाटील यांच्या पुतळ्याजवळ त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी शेकापक्षाचे जेष्ठ नेते काका पाटील समाज सेवक यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. या प्रसंगी जे.डी.तांडेल, रविशेठ भोईर, सुनिल पाटील, ॲड.पी.एन.पाटील प्रतिक पाटील पत्रकार रमेश थळी इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

## शुद्धीपत्रक

सदर शुद्धीपत्रकाद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, सिडको संचिका क्र.११९८ प्रमाणे मौजे : द्रोणागिरी नोड येथे सेक्टर क्र.५३, भूखंड क्र.१०० बी, क्षेत्र ३९.११ चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड हा श्री.मनोज मांगीलाल जैन रा.१६१६, महावीर विल्ला, उरण करंजा रोड, उरण, ता.उरण, जि.रायगड यांच्या मालकीचा असून सदर भूखंड श्री.नवीन लक्ष्मण पंडित रा.डिफेन्स कॉलनी गांधी नगर, ग्वॉलीअर यांच्या नावे सिडको दप्तरी हस्तांतरण करण्याबाबत दिनांक २९/०१/२०२१ रोजी ''दैनिक रायगड नगरी'' या वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात आली असता त्यात भूखंड क्र.१०० बी ऐवजी भूखंड क्र.१०० असे नजर चुकीने जाहीर नोटीसीमध्ये प्रसिद्ध झालेले आहे. तसे नसून संचिका क्र.११९८ प्रमाणे मौजे : द्रोणागिरी नोड येथे सेक्टर क्र.५३, भूखंड क्र.१०० बी, क्षेत्र ३९.११ चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड असे आहे.
दि.१५/०६/२०२१

सही/-
**ॲड.मारिया कोळी**
**१ मजला, श्री प्रेरणा अर्पा.,**
**उरण, ता.उरण, जि.रायगड**
**मो.नं.९७०२२०९११४**
Email : mariya.koli@yahoo.com

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : केवाळे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे. सदर मिळकतीचे मालक काळुराम जोमा खुटले यांचेकडून आम्ही कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : केवाळे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| जमीन मालकाचे नाव | गट क्रमांक / उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| काळुराम जोमा खुटले | ५९/१/क | ०.२२.५० पैकी विक्री क्षेत्र ०.०६.०० | ३.६४ |

सबब या जाहीर नोटीसीने तमाम लोकांना कळविण्यात येते की, सदर मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाचे आत आपल्या हक्क हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाहीत असे समजून आम्ही सदर मिळकतीचे विक्रीच्या कराराचे/खरेदीखताचे व हस्तांतरणाचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे व हरकती यांचा विचार करण्यात येणार नाही. सदर तक्रारी, दावे वा हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.
पनवेल
दि.१५/०६/२०२१

सही/-
**श्री.मुकेश अशोक निधान**
**२०३, त्रिमुर्ती सिद्धार्थ को.ऑप.हौ.सो.लि.,**
**प्लॉट नं.५२, सेक्टर ३०, ओवे, खारघर,**
**ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९७६९७९९४०५**

**पृष्ठ क्र.१ वरुन...**

## उरण-करंजा खड्डेमय रस्ता तात्काळ दुरुस्ती करण्याची मागणी

रस्ता दुरुस्त केला होता.परंतु कालांतराने या रस्त्याच्या दुरुस्ती कडे कोणीही लक्षच दिले गेले नाही ह्या रस्त्याची दुरुस्ती सिडको करेल का जिल्हापरिषद करेल ह्याचातच वेळ निघून चालला आहे. आत्ता तर ह्या मार्गावर अनेक ठिकाणी खड्डे पडून पाणी साचले आहे. त्यामुळे वाहनांना या रस्त्यावरून वाट काढून प्रवास करावा लागत आहे. तर मुळेखंड गावाच्या प्रवेश द्वाराजवळच मोरीच्या खालचा भाग खचून मोठे भगदाड पडले आहे. या पडलेल्या भगदाडा मुळे आणि रस्त्यावरील खड्ड्यामुळे एखादा मोठ्या अपघात होऊन जीवित हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या भागात विविध पक्षाचे लोकप्रतिनिधी आहेत परंतु या लोकप्रतिनिधींना जनतेच्या समस्याकडे वेळच नसल्याचे दिसून येत आहे. रस्ता वर्गीकरण वरून संबंधित खात्याचे अधिकारी आणि लोकप्रतिनिधीकडून या रस्त्याकडे होत असलेल्या दुर्लक्ष पणामुळे जनतेतून संताप व्यक्त होत आहे.

## कोविड हेल्थ सेंटरचे पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते उद्घाटन

डॉ.विकास कांबळे आणि त्यांचे सर्व सहकारी, खालापूर ता. शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री.संतोष जंगम, कार्यवाह श्री.किशोर पाटील यांच्यासह सर्व पदाधिकारी, खोपोली कारखानदार संघाचे पदाधिकारी तसेच सर्व राजकीय पक्षांचे प्रमुख पदाधिकारी व अन्य मान्यवर उपस्थित होते.

या कोविड सेंटरमध्ये ५० बेडस् ची क्षमता असून १५ बेडस् ऑक्सिजन व ३६ बेडस् हे जनरल वॉर्डसाठी असणार आहेत. खालापूर येथील ग्रामीण रुग्णालय मंजूरीसाठी अंतिम टप्प्यात असून तालुक्यातील आरोग्य सुविधा अधिक बळकट करण्यासाठी बोरगाव, सावरोली येथे प्राथमिक आरोग्य केंद्र तर आसरे व वासांबे येथे प्राथमिक आरोग्य उपकेंद्राची उभारणी करण्यात येत असून त्यासाठी जागेचे हस्तांतरण देखील झाले आहे.

महाराष्ट्रातील एकमेव असे हे कोविड रूग्णालय असून ते पूर्णतः आधुनिक असून सर्व उपचार मोफत पुरविणार असल्याने सर्व मान्यवरांनी याबाबत विशेष गौरवोद्गार काढले. हे कोविड रुग्णालय कार्यान्वित करण्यासाठी सर्व क्षेत्रातून मदत करण्यात आली आहे. तसेच आमदार महेंद्र थोरवे व चित्राताई पाटील यांच्यासह विविध मान्यवरांनी मोठे आर्थिक सहकार्य केले असून वैद्यकीय कर्मचाऱ्यांचा खर्च कारखानदार संघ तर ऑक्सिजनचा खर्च श्री.सुनील गुप्ता हे करणार आहेत. येथील केमिस्ट असोसिएशननेही या कार्याकरिता उत्तम सहकार्य केले आहे. या सर्व दात्यांचे त्यांच्या दानशूरपणाबद्दल सर्व मान्यवरांनी आभार मानले. शेवटी नगरसेवक मोहन औसरमल यांनी आभार प्रदर्शन केले.

## सिडकोच्या नैना प्रकल्पाच्या परियोजनांची जलद गतीने अंमलबजावणी

अंमलबजावणी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ मधील अस्तित्वात असलेल्या नगर रचना परियोजनांच्या माध्यमातून करण्याचा निर्णय राज्य शासनाकडून घेण्यात आला व सदर प्रकल्पाकरिता परियोजना तयार करण्याबाबतचे निर्देश शासनाकडून सिडकोला देण्यात आले. नैना प्रकल्पाच्या नगर रचना परियोजनांचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे जमीन संपादन न करता सहभागी तत्त्वावर भूखंडांचा विकास केला जाणार आहे. योजनेत सहभागी होणारे भूधारक विकासाकरिता समान जमिनीचे योगदान देणार आहेत. या योजनेतील जमीन मालकांना मूळ भूखंडाच्या ४० टक्के भूखंड हा विकासयोग्य नियमित आकाराचा अंतिम भूखंड म्हणून परत मिळणार या भूखंडाकरिता मूळ जमिनीएवढाच चटई क्षेत्र निर्देशांक लागू असणार आहे. उर्वरित ६०% जमिनीवर सिडकोकडून रस्ते, खेळाचे मैदान, बगिचा, शाळा, ग्रोथ सेंटर इ. भौतिक सुविधा विकसित करण्यात येणार आहेत. जमीन मालकाची जमीन कुठल्याही आरक्षणाने बाधित होणार असली तरी त्यांना ४०% भूखंड मिळणार आहे.

सिडकोकडून नैना प्रकल्पाच्या अंतरिम विकास आराखड्यातील २३ गावांकरिता ११ परियोजना राबविण्यात येणार असून त्यांपैकी १ ते ३ योजना मंजूर झाल्या असून त्यांवर विविध स्तरावर कार्यवाही सुरू आहे. महाराष्ट्र शासनाकडून नगर रचना परियोजना क्र. १ ला प्राथमिक स्वरूपात मंजुरी देण्यात आली आहे. नगर रचना परियोजना क्र. ४ ते ११ या जमीन मालकांच्या मागणीच्या प्राधान्याप्रमाणे हाती घेण्याचा निर्णय सिडकोने घेतला असून या योजनांची अंमलबजावणी व त्या माध्यमातून पायाभूत सुविधांचा विकास शीघ्र गतीने व्हावा, याकरिता संबंधित जमीन मालकांनी लवकरात लवकर आपले संमतीपत्र सादर करण्याचे आवाहन सिडकोकडून करण्यात आले आहे. यामुळे सदर परियोजना प्राधान्याने सुरू करता येऊन जमीन मालकांना त्यांच्या जमिनीचा वापर विकासकामांकरिता करता येणे सुकर होईल व त्यांच्या जमिनीला वेळेच्या आधी मागणी वाढणार आहे.


सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूसंपादन विभागातर्फे साडेबावीस टक्के योजनेतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधिताना वाटपाबाबत अटी व हरकती प्राप्त करण्याकरिता प्रस्तावित करण्यात येतआहे.

| अ. क्र. | संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता (चौ.मी.) | वाटपपत्र देण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | भूखंडाच्या वाटपाशी संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | नोड-पुष्पक नोड (उलवे) | | | | |
| १ | ३६/NM | मौजे- गव्हाण ता.पनवेल जि. रायगड प्रकरण क्र.१० | २५९/१ | ४-३०-० | ३३९० चौ.मी. | पुष्पक नोड उलवे येथील भूखंड क्र. ३३९ सेक्टर २६ क्षेत्र ३३९० चौ.मी. | श्री. संदिप धनसुखभाई पटेल<br>श्री. चेतन धनसुखभाई पटेल | निरंक |
| २ | | | | | ३३९० चौ.मी. | पुष्पक नोड उलवे येथील भूखंड क्र. ३९१ सेक्टर २६ क्षेत्र ३३९० चौ.मी. | श्री. दिनेश रतनशीबाई पटेल<br>श्री. हेमांग दिनेशभाई पटेल | |
| | | **एकूण क्षेत्र** | | ४-३०-० | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितानी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकाच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितानी सदर जाहीर सूचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात, अर्ज व पूरक कागदपत्रांसह बाब निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करुन पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितानी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :-** **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**
भूसंपादन विभाग, १ ला मजला, सिडको भवन,
सी.बी.डी., बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४

**अप्पर जिल्हाधकारी तथा**
**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**
सिडको/जनसंपर्क/१०३/२०२१-२२

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## विज्ञान प्रयोग प्रदर्शन २०२१ मध्ये गट पहिला समुद्री लाटापासून वीज निर्मिती

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राष्ट्रीय स्तरावरील जीएमआरटी व इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ नॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने भरविण्यात आलेल्या विज्ञान प्रयोग प्रदर्शन २०२१ मध्ये गट पहिला मध्ये अलिबाग येथील चिंतामणराव केळकर विद्यालयाची स्वरा अविनाश पाटील हिच्या समुद्री लाटा पासून वीज निर्मिती या प्रकल्पाला तृतीय क्रमांक मिळाला. ऑनलाईन बक्षिस समारोहा साठी इस्त्रो व बी ए आर सी चे शास्त्रज्ञ सुद्धा उपस्थित होते.



यासाठी देशभरातून १२०० विद्यार्थी सहभागी झाले होते.जवळजवळ ५३९ विज्ञान प्रयोगांतून अंतिम फेरीत फक्त १५ प्रयोग निवडून त्यांची ऑनलाइन पद्धतीने वेगवेगळ्या शास्त्रज्ञांनी व मूल्यमापन कमिटीने मुलांची अतिशय चौकस पणे परीक्षा घेतली. यामध्ये मुलांचे योगदान व चौकस बुद्धी व जिज्ञासू वृत्ती यावर गुणदान करण्यात आले. राष्ट्रीय प्रमाणपत्र व ट्रॉफी हे बक्षिसाचे स्वरूप आहे. या

स्पर्धेमध्ये अलिबाग येथील चिंतामणराव केळकर शाळेतील मुख्यध्यापिका सरोज मळेकर व सहशिक्षिका प्राजक्ता वार्डे यांनी मार्गदर्शन केले तसेच कोकण विभाग प्रमुख श्री संदीप वारगे सरांनी बहुमोल सहकार्य केले. त्यामुळे सर्व स्तरातून स्वराचे, शाळेचे व तिच्या पालकांचे कौतुक होत आहे.

## अज्ञात त्रिकुट मोबाईल खेचून पसार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पिकअप गाडी बंद पडली असल्याने तीन अज्ञात इसम गाडीच्या चालका जवळ येवून त्यांनी त्याच्याजवळील मोबाईल फोन जबरीने खेचून पसार झाल्याची घटना तालुक्यातील पापडीचा पाडा परिसरात घडली आहे.

ब्रह्मदेव ठाकूर (२८) हा टेम्पो चालक व त्याचा सहकारी यांचा पिकअप टेम्पो बंद पडल्याने त्यांचा गाडीचा दरवाजा उघडा असता तीन अज्ञात इसम त्यांच्याजवळ येवून राज कौन है? तु पहचानता है क्या? असे बोलून त्यातील एका पटकन त्यांच्या जवळील २४ हजार रुपये किंमतीचा मोबाईल फोन खेचून पिकअपचा दरवाजा ढकलून बंद केला व ते पळून गेले आहेत. याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# सुधागडातील दोन तरुणींची यशोगाथा, आधुनिक लागवडीतून घेतले ५ टन कलिंगडाचे उत्पादन

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

जीवनात मोठं ध्येय बाळगून त्याला कृती व परिश्रमाची जोड दिल्यास कोणतीही गोष्ट कठीण नसते हे रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यासारख्या दुर्गम व आदिवासी बहुल तालुक्यातील दोन तरुणींनी दाखवून दिलंय. सुधागड मधील या दोन तरुणीची यशोगाथा सर्वांना प्रेरक ठरते आहे. पायरीची वाडी जवळील स्वतःच्या शेतात त्यांनी आधुनिक पद्धतीने कलिंगड लागवड केली आहे. कृषीविषयक शिक्षण घेत असतांनाच या दोन तरुणींनी या वर्षी एप्रिल मध्ये भर उन्हाळ्यात कलिंगड लागवड करून तब्बल ४ ते ५ टन कलिंगड पीक घेतलेले आहे. पालीतील



ऐश्वर्या सचिन जवके आणि साक्षी पवार या दोन तरुणींनी मोठ्या परिश्रमाने भर लॉकडाऊन काळात कलिंगडाचे पीक घेण्याचा संकल्प केला, व माळरान भागात उपलब्द असलेल्या आपल्या शेतीत नंदनवन करण्याचे काम केले. ऐश्वर्या जवके बीएससी ॲग्रीकल्चर तर साक्षी पवार बीएससी होर्टी कल्चर चे शिक्षण घेत आहे, यातून त्यांना शेतीची आवड निर्माण झाली. त्यांनी शेती करण्याचा संकल्प केला, कलिंगड लागवडीचा सिजन नाही, वेळ निघून गेली, कोरोना आहे, लॉक डाऊन आहे, बापाचे पैसे वाया घालवाल अशी कुचेष्ठा होत असताना या मुलींनी मात्र कृषी क्रांतीच्या दिशेने टाकलेले पाऊल मागे घेतले नाही, मोठ्या धाडसाने त्यांनी जमीन कसण्यास सुरवात केली, आधुनिक पद्धतीने रोप लागवड केली. आणि डोळे दिपून जावेत अस उत्पादन काढून दाखवलं आहे. ऐश्वर्या जवके हिने बोलताना सांगितले की आम्ही कोरोना काळात युवा पिढी बेरोजगारीच्या विळख्यात सापडली, अशा परिस्थितीत आम्ही शेती हा सर्वोत्तम पर्याय मानून शेती करण्याचे ठरवले. आम्ही शेती करताना प्रगत व अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला आहे, आम्ही मल्चिंग पेपरच्या साहाय्याने शेती केली आहे. आम्ही शेतात ड्रीपर लावलेले आहेत, त्यामुळे पाणी कुठेही वाया जात नाही, प्रत्येक रोपाला समान पाणी मिळते, लॉकडाऊन मूळे शेती लागवडीला उशीर झाला. आम्ही मार्च मध्ये प्लॅनटेशन करून सिलिंग ला सुरवात केली. तर पिचवर एप्रिल महिन्यात रोप लावली, अवकाळी पाऊस व वादळाने देखील धडक दिली, मात्र आम्ही डगमगलो नाही. सतत पिकांची निगा राखल्याने शेती बहरली.

चांगले उत्पादन देखील मिळाले. चार ते पाच टन कलिंगडाचे उत्पादन आम्ही घेतले आहे. यापुढे हा शेत जमिनीत पुढे मशरूम व हळद व इतर फळभाज्या पिकाचे प्लॅनटेशन करण्याचा आमचा मानस आहे. रायगड जिल्हा भाताचे कोठार म्हणून ओळखले जाते, जिल्ह्यात साध–ारण २२०० हेक्टर क्षेत्रावर उन्हाळी भातशेती केली जाते. जिल्ह्यात बहुतांश भातशेती वर भर दिला जातो, मात्र विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रात वेगवेगळी फळ, भाजी पिकाचे उत्पादन केले जाते, शेतकऱ्यांनी माती परीक्षण करून इतर पिकांची देखील लागवड करण्यावर भर दिला पाहिजे.जिल्ह्यात इतर भाजी व पिकलागवड कमी क्षेत्रात केली जाते, याबाबत उदासीनता दिसून येते, जिल्ह्यात तरुणांनी नोकरी व रोजगारासाठी वणवण न भटकता शेती क्षेत्राकडे वळून वेगवेगळे नाविन्यपूर्ण प्रयोग केल्यास विविध पिकांचे भरघोस उत्पादन घेऊन सधन होता येईल असे ऐश्वर्याने सांगितलं. साक्षी पवार ने बोलताना सांगितले की कलिंगड लागवडीचा हंगाम संपल्यानंतर आम्ही कलिंगडाची शेती करण्यासाठी पाऊल टाकले, लोकांनी हंगाम संपला, पावसाळ्यात कलिंगडाचे पीक कसे येईल, मेहनत व पैसे वाया जातील अस अनेकांनी नकारात्मकता दाखवली मात्र आम्ही जिद्दीने कलिंगडाची आधुनिक शेती करण्याचे निश्चित केले व त्यादृष्टीने आम्ही पावले टाकली, आम्ही नामदेव उमाजी बियाणे वापरून १००० सिलिंग द्वारे लागवड केली. मोठ्या कष्टाने आमचा मळा बहरला, मोठे उत्पन्न निघाले. यापुढे आम्ही याच शेतीत वेगवेगळे पीक घेण्याच्या दृष्टीने प्रयोग करणार आहोत. असे साक्षीने सांगितले.

## राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमाचे पनवेल मनसेतर्फे आयोजन





**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र नवनिर्माण सेना अध्यक्ष राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त मनसे पन–वेल शहर तर्फे विविध ठिकाणी वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

नेरे भनगर येथील करुणेश्वर वृद्धाश्रमात बेडवरील रबरी मॅटची गरज लक्षात घेऊन अवधूत ठाकूर,आकाश दलाल,अक्षय जोशी, विशाल चित्रुक यांच्या पुढाकाराने बेडवरील ४० रबरी मॅट चे वाटप करण्यात आले.

तर पनवेल येथे गरजू रिक्षा–चालक व गरिब कामगार वर्ग यांना ५० कुटुंबियांना अन्नधान्याचे वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमास मनसे रायगड उपजिल्हाध्यक्ष अतुल चव्हाण, विधानसभा सचिव प्रतिक वैद्य, पनवेल उपशहर अध्यक्ष संदीप पाटील, प्रकाश लाड, वाहतूक सेना शहर अध्यक्ष सिद्धेश खानविलकर, ज्येष्ठ महाराष्ट्रसैनिक संजय मुरकुटे, सचिन सिलकर, विरेंद्र गुप्ता, गणेश गायकर, आकाश घाटे, अनिल दिवटे, अलंकार घाटे, संचित मोरे आणि इतर कार्यकर्ते उपस्थित होते. तर पनवेल येथील कार्यक्रमात मनसे पनवेल विधानसभा सचिव प्रतिक वैद्य, पनवेल उपशहर अध्यक्ष संदिप पाटील, प्रकाश लाड, रूपेश शेटे, मंदार पाटणकर वाहतूक सेना शहर अध्यक्ष सिद्धेश खानविलकर, ज्येष्ठ महाराष्ट्रसैनिक संजय मुरकुटे, सचिन सिलकर, अनिमेश ओझे, दिपक शहा, अवधूत ठाकूर, गणेश गायकर, आकाश गाडे, अभि रिंगें, अक्षय जोशी, हिमांशु पाटील, आकाश घाटे, आकाश दलाल, विशाल चित्रुक आणि इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

## मराठा क्रांती मोर्चाची १८ जूनला पनवेल येथे बैठक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मराठा क्रांती मोर्चाची मुक आंदोलनाच्या नियोजनाच्या संदर्भात पनवेल येथील व्ही. के.हायस्कूल या ठिकाणी येत्या १८ जून रोजी सकाळी ११ वाजता बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

मराठा क्रांती मोर्चा महाराष्ट्र मूक आंदोलन छत्रपती संभाजी राजेंनी १६ जून पासून कोल्हापूर येथून आंदोलनाला सुरुवात करत आहेत. त्यानंतर नाशिक, संभाजीनगर, अमरावती आणि रायगडची २८ जून तारीख दिली आहे. असे पहिल्या टप्प्यात आंदोलने होणार आहे. रायगडची तयारी करण्यासाठी १८ जूनला जिल्ह्याची बैठक घ्यायची आहे.

तरी सर्व तालुक्यातील ४/५ समन्वयक मिटिंग ला येणे आवश्यक असल्याचे विनोद सदाशिव साबळे, सुनील पाटील, गणेश कडू, राजेश लाड, शंकर पवार, प्रदीप देशमुख, हरीश बेकावडे, रुपेश कदम, अविनाश पाटील, संतोष पवार, शरद गोळे, अनिल भोसले, शशिकांत मोरे, नरेश सावंत, चेतन सुर्वे, कमलाकर लबडे, संजोग मानकर, संतोष साप्ते, वाय सी जाधव यांनी सांगितले आहे.

## भेंडखळ ग्रामपंचायतीने संपूर्ण गावातील नागरिकांना कोरोना लस देऊन नवा आदर्श निर्माण केला



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील भेंडखळ येथे वाढत्या कोरोनाच्या प्रादुर्भावाला रोखण्यासाठी सर्व प्रांतातुन व माध्यमातून युद्ध पातळीवर प्रयत्न चालू आहेत. त्यात भेंडखळ गावाच्या ग्रामपंचायतीने एक पाऊल पुढे टाकून गावाच्या हितासाठी व सुरक्षिततेसाठी सामाजिक बांधिलकी जपून संपूर्ण गावाचे लसीकरण करून कोरोना महामारीच्या या रोगाला हद्दपार पूर्ण गाव कोरोना मुक्त करण्याचा संकल्प केला आहे.

सुराना हास्पिटल चेंबूर मार्फत या लसीकरणाची सुरवात झाली. या कार्यक्रमाचे उदघाटन डॉ.अविनाश यांनी केले. तर या कार्यक्रमाला मच्छिंद्र घरत, राम भगत, सूर्यकांत ठाकुर, विजय ठाकुर, आविनाश जाधव, अमोल सावंत, डा.भोसले, डॉ.वाघ, डॉ.ठाकरे, सुरज ठाकुर, आणि संतोष पवार, ग्रा. वि. अधिकारी डी.एम.तुरे आदी मान्यवर व सामाजिक कार्यकर्त्यांनी बहुमोल उपस्थिती दाखवून सहकार्य केले.

या अगोदरही भेंडखळ ग्रामपंचायतीने या कोरोना काळात गाव व गावाच्या विकासासाठी व सुरक्षिततेसाठी अथक प्रयत्न व नियोजन केले आहे, सुरूवातीला कोरोना काळात गावातील प्रत्येक माणसाला ५ मास्क १ सेनिटायझर वाटप केले. तसेच संपूर्ण गावाचा चोख सुरक्षा बंदोबस्त करून संपूर्ण गाव फवारणी करून घेतले. तसेच दुसऱ्या टप्प्यातही प्रत्येकी ४ मास्क व हन्डवाश वाटप केले. या काळात बेरोजगार, गरीब लोक यांना धान्य वाटप केले. या सुविधेचा परप्रांतीयांनाही लाभ झाला, आता तर प्रत्येक घराला एक अशी वाफाऱ्याची मशीनही ग्रामपंचायतीने देवून केली.

विशेष म्हणजे या गावाला संपूर्ण महाराष्ट्रातून राज्यपालांच्या हस्ते २०११ ला निर्मल ग्राम स्वच्छता पुरस्कार हे बक्षीस देण्यात आले आहे. भेंडखळ गावच्या ग्रामपंचायतीचे असे उत्कृष्ट काम केले आहे. या वेळी सरपंच भाग्यश्री चव्हाण, उपसरपंच लक्ष्मण ठाकुर, ग्रा.पं.सदस्य कृष्णा ठाकुर, किशोर ठाकुर, रतन ठाकुर, सौ.योगिता योगेश ठाकुर, सौ.सोनाली कौस्तुभ ठाकुर, सौ.संध्या दिपक ठाकुर, सौ.निता लिलेश्वर ठाकुर, सौ.सुचिता चेतन ठाकुर, सौ.स्वाती महेंद्र घरत व सौ.निलम हसुराम भोईर, लिलेश्वर ठाकूर, हसुराम भोईर ग्राम विकास अधिकारी डी.एम.तुरे, कर्मचारी सौ .निशा वशेणीकर, दीपा माटे, प्रेमा पाटील, वंदना चव्हाण आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते.

## कळंबोली वसाहत परिसरातील धोकादायक वृक्षांच्या छाटणी कामाला सुरूवात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली वसाहत परिसरातील धोकादायक वृक्षांची छाटणी तातडीने करावी अशी मागणी स्थानिक नगरसेवक रवींद्र भगत यांनी पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त सुधाकर देशमुख यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली होती. या मागणीची दखल घेत कळंबोली वसाहतीमध्ये लोंबकळत असलेल्या वृक्ष व त्याच्या फांद्या छाटणी कामाला सुरूवात झाली आहे.



कळंबोली प्रभाग क्र.१० सेक्टर १ ई काळभैरवनाथ मंगल कार्यालय ते सुधागड स्कूल सेक्टर २ गार्डन तसेच सेक्टर ३ हनुमान मंदिर येथील धोकादायक वृक्षांच्या फांद्यामुळे एखादी दुर्घटना अपघात होवू शकतो. त्याचा त्रास स्थानिक रहिवाशांना होत आहे. तसेच विद्युत वाहिनी तुटून विद्युत पुरवठा सुद्धा खंडीत होतो. नुकताच पावसाळा सुरू झाला असल्याने आगामी काळात धोका लक्षात घेवून या झाडांच्या फांद्या छाटून टाकण्यात याव्यात, अशी मागणी नगरसेवक रवींद्र भगत यांनी केली होती. या मागणीची दखल घेत सदर काम सुरू करण्यात आल्याने परिसरातील रहिवाशांनी नगरसेवक रवींद्र भगत यांचे आभार मानले आहेत.


# ग्रामपंचायत आकुर्ली

ता.पनवेल, जि.रायगड

## जाहीर निविदा

दि.१५/०६/२०२१

सर्व अधिकृत ठेकेदार यांस कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे कामासाठी सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तरी अधिकृत ठेकेदारांनी दिनांक १८/०६/२०२१ ते दि.२४/०६/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत निविदा पाठवाव्यात. आलेल्या निविदा त्यास दिवशी शक्य झाल्यास दि.२५/०६/२०२१ सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील. त्यावेळी उपस्थित रहावे. कोणतीही एक अगर सर्वच निविदा मंजूर करणे अगर नाकारणेचा अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये | इसारा रक्कम १% | निविदा फॉर्म मिळण्याची मुदत | निविदा फॉर्म स्वीकारण्याची अंतिम तारीख | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | |
| १ | साई सपना कॉम्प्लेक्समध्ये चेकर लादी बसविणे. (१५ वा वित्त आयोग) | ८२४३० | ८२४ | दि.१८/०६/२०२१ ते दि.२२/०६/२०२१ | २४/०६/२०२१ दु.३.०० वाजेपर्यंत | |
| २ | रामचंद्र आंबेकर ते नामदेव म्हात्रे पर्यंत कॉंक्रीटीकरण करणे. (१५ वा वित्त आयोग) | ५२४९४१ | ५२४९ | दि.१८/०६/२०२१ ते दि.२२/०६/२०२१ | २४/०६/२०२१ दु.३.०० वाजेपर्यंत | |
| ३ | विशेष रेसिडेन्सी ते अपेक्षा कॉम्प्लेक्स पर्यंत पाईप गटार व आर.सी.सी. रस्ता करणे. (१५ वा वित्त आयोग) | ७७४६७८ | ७७४६ | दि.१८/०६/२०२१ ते दि.२२/०६/२०२१ | २४/०६/२०२१ दु.३.०० वाजेपर्यंत | |
| ४ | पुष्पशेवंती ते रामचंद्र निवास पर्यंत कॉंक्रीटीकरण करणे. (१५ वा वित्त आयोग) | ५७४५८२ | ५७४५ | दि.१८/०६/२०२१ ते दि.२२/०६/२०२१ | २४/०६/२०२१ दु.३.०० वाजेपर्यंत | |
| ५ | साई सपना कॉम्प्लेक्समध्ये चेकर लादी बसविणे. (१५ वा वित्त आयोग) | १०८६१० | १०८६ | दि.१८/०६/२०२१ ते दि.२२/०६/२०२१ | २४/०६/२०२१ दु.३.०० वाजेपर्यंत | |

अटी/शर्ती :–

१) सदर कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.
२) इसारा रक्कम रोखीत भरावा लागेल.
३) निविदा किंमत नापरतावा समजावी.
४) नियमाप्रमाणे आयकर तसेच इतर कर भरावे लागतील.
५) अधिकृत ठेकेदाराने निविदा न भरल्यास अनुभवी ठेकेदाराचा विचार केला जाईल.
६) निविदा मंजूर केल्यास रु.५००/– चे स्टॅम्प पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.
७) ५% सुरक्षा अनामत प्रत्येक बिलातून कपात केली जाईल.
८) इसारा व सुरक्षा अनामत ९० दिवसांनी कामाचा दर्जा पाहून परत मिळेल.
९) वर्क ऑर्डर प्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास व दुसऱ्या ठेकेदारांकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास जबाबदार रहावे लागेल.
१०) वरील अटी मान्य असणाऱ्यांनीच निविदा भरावी.

**सही/–**
**श्री.जयेंद्र घनश्याम म्हात्रे**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत आकुर्ली**

**सही/–**
**सौ.भारती सचिन पाटील**
**सरपंच**
**ग्रामपंचायत आकुर्ली**


## पोलादपूर तालुक्यातील पितळवाडी येथे अत्यावश्यक वैद्यकीय उपकरणे प्रदान

### धैर्य सामाजिक आणि युवा परिवर्तन संस्थांचा संयुक्त उपक्रम

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

ठाणे येथील धैर्य सामाजिक संस्थेच्या प्रयत्नातून आणि युवा परिवर्तन संस्था, मुंबई यांच्या माध्यमातून पोलादपूर तालुक्यातील नरवीर तानाजी मालुसरे प्राथमिक आरोग्य केंद्र, पितळवाडी येथे अत्यावश्यक वैद्यकीय उपकरणे प्रदान करण्याचा उपक्रम पार पडला.



पोलादपूर तालुक्यातील सर्व नागरिकांची आरोग्याबाबत होणारी गैरसोय लक्षात घेऊन कोरोना संसर्गावर मात करण्यासाठी २ ऑक्सिजन सिलेंडर, २ ऑक्सिजन कॉन्सेन्ट्रेटर मशीन, २००पीपीई किट, १०० मास्क, ५ पल्स ऑक्सिमिटर या वैद्यकीय उपकरणांची देणगी धैर्य सामाजिक संस्थेच्या प्रयत्नातून नरवीर तानाजी मालुसरे प्राथमिक आरोग्य केंद्राला प्रदान करण्यात आली. ही सर्व उपकरणे इक्रिफॅक्स कंपनीने देणगी स्वरूपात दिली. या उपक्रमासाठी युवा परिवर्तन संस्थेचे व्यवस्थापक सुदेश शिंदे, धैर्य सामाजिक संस्था अध्यक्ष ओंकार उतेकर, चाळीचा कोंड गावचे अध्यक्ष चिमाजी शिंदे, मुंबई मंडळाचे अध्यक्ष नारायण शिंदे, माजी उपसभापती लक्ष्मण खेडेकर, माजी पोलीस उपनिरीक्षक महादेव उतेकर, बोरावळे ग्रामपंचायत सदस्य वसंत शिंदे, पोस्ट मास्टर नाना जाधव उपस्थित होते. वैद्यकीय मदत स्वीकारण्यासाठी आरोग्य केंद्राचे प्रमुख डॉ.सोपान वाघतकर, सारिका देशमुख, श्रद्धा सुर्वे उपस्थित होते.

धैर्य सामाजिक संस्थेच्या माध्यमातून आतापर्यंत तालुक्यात आलेली हि सर्वात मोठी वैद्यकीय मदत असल्याचे संस्थेचे अध्यक्ष ओंकार उतेकर यांनी सांगितले. तसेच युवा परिवर्तन संस्था आणि धैर्य सामाजिक संस्था मिळून तालुक्यात भविष्यातही असेच लोकोपयोगी उपक्रम राबवतील अशी माहिती युवा परिवर्तन संस्थेचे व्यवस्थापक सुदेश शिंदे यांनी दिली.

# संक्षिप्त...

## गळ्यातील चेन खेचून दोघेजण पसार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मॉर्निंग वॉक करीत असलेल्या एका इसमाच्या गळ्यातील सोन्याची चेन खेचून मोटार सायकलवरुन आलेले दोघे अज्ञात इसम पसार झाल्याची घटना कामोठे वसाहतीमध्ये घडली आहे.

डॉ.सुनील कातकडे (४६) हे मॉर्निंग वॉक सेक्टर १७ कामोठे येथे करीत असताना त्यांच्या मागून काळ्या मोटार सायकलवरुन आलेल्या दोन अज्ञात इसमापैकी एकाने त्यांच्या गळ्यातील ३५ ग्रॅम वजनाची १६ हजार रुपये किंमतीची चेन जबरीने खेचून ते पसार झाले आहेत. याबाबतची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## अल्पवयीन मुलीचे अपहरण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका १३ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण केल्याची घटना तालुक्यातील नांदगाव गावात घडली आहे.

या ठिकाणी राहणारी १३ वर्षीय मुलगी रंग गोरा, केस काळे लांब, उंची ४ फूट २ इंच, अंगाने सडपातळ, नाकात पिवळ्या धातूची मुरणी, हातात काळ्या रंगाचे घड्याळ असून अंगात पांढऱ्या रंगाचा कुडता व काळ्या रंगाची लेगीज तसेच पायात काळ्या रंगाची प्लॅस्टीकची चप्पल आहे. या मुलीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

## दमदार पावसामुळे भाताची रोपं तरातली

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

भाताची रोपं वाढण्यासाठी पडत असलेल्या दमदार पावसामुळे सद्य स्थितीत भाताची रोपं चांगलीच तरा-रली असल्याचे सर्वत्र पहावयास मिळत आहे.




या वर्षीच्या पावसाळी हंगामात सुरूवातीपासून चांगल्या पद्धतीने बरसत असलेल्या पावसामुळे व पेरणीलायक पडलेल्या पावसामुळे शेतकरी वर्गाने आ-पापली पेरणीची कामेही योग्य वेळेत पुर्ण केली. तर सद्य स्थितीत कोसळत असलेल्या दमदार पावसामुळे भाताची रोपंही चांगलीच तरारल्याने शेतकरी वर्गही समाधानी दिसत आहे. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात वरकस पट्ट्यात करण्यात आलेल्या धुळवाफेच्या पेरणीची रोपं तर चांगलीच बहरली आहेत. भातशेतीच्या कामालायक पडत असलेल्या पावसामुळे शेतकरीवर्गातून समाधान व्यक्त केले जाऊ लागले आहे. तर पावसाची परिस्थिती अशीच राहिली तर पुढील हंगामातील भात लागवडीची कामेही योग्य वेळेत पुर्ण होतील. असा अंदाज शेतकरी वर्गातून व्यक्त केला जाऊ लागला आहे.दरवर्षाच्या मानाने या वर्षी मात्र पाऊस ब-यापैकी पडत असल्याने शेती क्षेत्रासह अन्य क्षेत्रातूनही समाधान व्यक्त केले जाऊ लागले आहे.

# पनवेल महानगरपालिकडून सहा वर्षाच्या मालमत्ता कराची देयके सर्वसामान्य नागरिकांना

## नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांना महानगरप्रमुख रामदास शेवाळे यांचे निवेदन

**दै.रायगड नगरी । पनवेल**



पनवेल पालिका क्षेत्रातील राहणाऱ्या नागरिकांना पनवेल महापालिका प्रशासनाने गेल्या पाच वर्षात कोणतीही सेवा न देता मालमत्ता कराची देयके पाठविली आहेत. हे येथील जनसामान्यांना मान्य नाही. त्यामुळे येथील नागरिकांचा हा मालमत्ता कर भरण्यास विरोध कायम असून याबाबत सिडको महामंडळ व पनवेल महानगरपालिका यांच्या उच्च पदस्थ अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेवून कराबाबत योग्य तो निर्णय घ्यावा असे निवेदन महानगरप्रमुख रामदास शेवाळे यांनी नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांना दिले आहे.

त्यांनी पुढे म्हटले आहे की, सामान्य पनवेल पनवेलकर कोरोना वैष्विक महामारीमध्ये त्रस्त असताना पनवेल महानगरपालिकेने थकीत पाच व सुरू असलेल्या आर्थिक वर्षासह सहा वर्षाचा मालमत्ता कराच्या देयके सामान्य नागरिकांना दिलेली आहेत. महागाई, कोरोना साथरोग अशा अनेक कारणाने सामान्यांचे रोजगार व उद्यो मंदीत असताना अवाजवी, जाचक कर लावून सामान्य जनतेची लूट पालिकेकडून करण्यात येत आहे. कर मागणे व सेवा महापालिकेचे कर्तव्य आहे. परंतु माणुसकीच्या नात्याने अवाजवी कर वसूल करणे हे तितकेच बेकायदेशीर आहे. पालिकेने कर लावत असताना अनक गोष्टींकडे दुर्लक्ष केलेले आहे. पालिका व सिडको महामंडळाचा समन्वय नसल्या कारणाने विनाकारण वेगवेगळे कर व सेवा शुल्क, हस्तांतरण शुल्क नागरिकांस भरावे लागत आहेत. सदरहू कराबाबत व देयकांबाबत सुसुत्रता पारदर्शकता येणे गरजेचे आहे. सिडको महामंडळ व पनवेल महापालिका यांच्या उच्च पदस्थ्य अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घवून कराबाबत योग्य तो निर्णय घ्यावा, जेणेकरून सामान्य पनवेलकरांना लादण्यात आलेला जाचक कर कमी होवून न्याय मिळेल व सदर बैठकीचा निष्कर्ष निघेपर्यंत सदर कर वसुलीस स्थगती द्यावी, असे निवेदन महानगरप्रमुख रामदास शेवाळे यांनी नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांना दिले आहे.

# चिरनेरच्या शेतकऱ्यांचा आधुनिक शेतीचा प्रयोग



**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

बेभरवशी हवामान, मजूरांची कमतरता आणि त्यांची वाढलेली मजूरी या आणि इतर कारणांमुळे सध्या कोकणातील प्रामुख्याने रायगड जिल्ह्यात भात शेती करणे शेतकऱ्यांना परवडत नाही. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी शेती करणे सोडले आहे. त्याच अनुषंगाने शेतकऱ्यांचा शेतीचा खर्च कमी व्हावा व शेती परवडण्यासारखी व्हावी यासाठी शासनातर्फे नवनवीन प्रयोग राबविण्यात येतात. चिरनेरमध्ये देखिल अशा प्रकारचे प्रयोग करण्यास शेतकऱ्यांना कृषि विभागाने प्रवृत्त केले आहेत. नुकतेच या भागातील शेतकऱ्यांना ड्रम सिडरने भात पेरणी करण्याची पद्धत शिकविण्यात आली आहे.

ड्रम सिडरन पद्धतीमुळे शेतकऱ्यांचा लावणीचा खर्च वाचतो. ड्रम सिडरन पद्धतीत संपूर्ण शेतात ड्रमसिडरन मशिनच्या सहाय्याने पेरणी केली जाते. या पेरणीमुळे संपूर्ण शेतात टोकन पद्धतीने आणि एक दाणा पद्धतीने पेरणी होते. त्यामुळे शेतात लावणीचा आणि नांगरणीचा खर्च वाचला जातो. तसेच या पद्धतीत लावणी केल्यामुळे रोप जोमदार होते. खतांचा खर्च देखिल कमी होतो. कृषिमित्र प्रफुल्ल खारपाटील, बाळकृष्ण मोकल आणि इतर शेतकऱ्यांच्या शेतात क्रॉपकॅफेटेरिया करीता ९ या आणि आणि लालभात (रत्नागिरी-७) या बियाण्यांची पेरणी करण्यात आली. यावेळी बाळासाहेब सावंत कृषि विद्यापिठाचे खारभूमी संशोधनचे अधिकारी बोरसे, कृषि सहाय्यक उमेश गाताडी, कषि सहाय्यक श्री भोम हे उपस्थित होते. कृषि विभागाच्या या नविन प्रयोगाला या भागातील शेतकऱ्यांची मोठी पसंती मिळत असून अशा प्रकारे शेती करण्यास अनेक शेतकऱ्यांनी उत्सूकता दाखविली आहे.

# तळा तालुक्यात प्रथमच गिरणे येथे मोफत कोरोनाचे लसीकरण



**दै.रायगड नगरी । तळा**

रायगड जिल्हा परिषद व स्वदेश फाऊंडेशन च्या वतीने केंद्राच्या मोफत कोरोना लसीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळेला उपस्थित तळा तहसीलदार अण्णापा कन्नशेट्टी, पोलीस उपनिरीक्षक शिवराज खराडे, डॉ.अमोल बिरवाडकर व सहकारी गिरणे ग्रामपंचायत सरपंच ज्योती कैलास पायगुडे, स्वदेस फाऊंडेशन व महाराष्ट्र शासन सम्नयक तुषार इनामदार, स्वदेस आरोग्य विभाग प्रमुख सुधीर वाणी, डॉक्टर अनिल सिंग, तळा आरोग्य विभाग नयन पोटले, तळा सहा.मॅनेजर संतोष मोरे, तसेच स्वदेस समन्वयक सागर पाटील, समिर शिर्के, महेश पांचाळ, गिरणे ग्रामपंचायतीचे स्वदेस समन्वय बालाजी श्रीडोळे, ग्रामपंचायत सदस्य बाळाराम लोखंडे, पोलीस पाटील सचिन नात्ती, गावचे अध्यक्ष गोविंद रोंगे, खजिनदार जनार्दन चव्हाण, सेक्रेटरी अनंत नात्ती, स्वदेश गाव कमिटी अध्यक्ष सुभाष पासीलकर, स्वदेश आरोग्य सेविका शर्मिला विजय पासीलकर, आशा सेविका कामिनी केशव कीर्तने, ग्रामस्थ व महिला मंडळ, मोठया प्रमाणात हजर होते.

१२० जणांना लस देण्यात आली. ६० ते ८० वयोगटातील ५५ लोकांना, २ दिव्यांग बांधवांना घरी जाऊन लस देण्यात आली. तालुक्यातील हा पहिलाच उपक्रम राबविण्यात आला. ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. त्यामुळे ग्रामीण भागातील सर्वांना अधिक लवकर कोरोना लसीकरणाचा लाभ मिळून तालुक्यातील सर्वच ग्रामीण भागात उपक्रम राबविला तर निश्चितच कोरोना रूण संख्या प्रमाण कमी होईल. असे स्थानिक लोकांनी प्रतिक्रिया व्यक्त केली.

# साई येथे सहा दिवसाचे कडक लॉकडाऊन

**दै.रायगड नगरी । माणगाव**

माणगांव तालुक्यातील साई ग्रामपंचायत हद्दिमध्ये व साई बाजारपेठ या ठिकाणी सहा दिवसाचे कडक लॉकडाऊन मंगळवार १५ ते रविवार २० जून या कालावधीत करण्यात आले आहे. या संबंधित गावांमध्ये दोन दिवस अगोदर पूर्व सूचना देऊन दवंडी देण्यात आली.

कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी साई ग्रामपंचायत व या अंतर्गत असणारी गावे या गावातील सुज्ञ नागरिक व तरुणांनी सुद्धा योग्य असे सहकार्य करण्याचे ठरवले आहे. साई ग्रामपंचायत अंतर्गत साई मोहला, खैरवाडी, साई कोंड, बौद्धवाडी, साई गाव या गावातील जनतेने सुद्धा सहकार्य दाखवले आहे. साई ग्रामपंचायतचे सरपंच हुसेनभाई रहाटविलकर, उपसरपंच प्रकाश धुमाळ व सर्व सभासद, तसेच ग्रामसेवक तेटगुरे हे सुद्धा लोकांमध्ये जनजागृती करत असून गावच्या मुख्य ठिकाणी फलक लावून जागृती करत आहेत. तसेच साई प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचे सुद्धा सहकार्य वे-ळोवेळी मिळत आहे. साई ही मुख्य बाजारपेठ असल्यामुळे या ठिकाणी बाजारामध्ये जीवनाश्यक वस्तू खरेदी करण्यासाठी आजूबाजूला असणाऱ्या गावातील नागरिक मोठया संख्येने येत असतात. त्यामुळे बाजारपेठेत गर्दी होत असते. परंतु दोन दिवस अगोदर जनजागृती केल्यामुळे आजूबाजूच्या गावांना सुद्धा संदेश पोहचला असून बाजारपेठ बंद असल्यामुळे घरातून कोणच बाहेर पडत नाही. या घेतलेल्या निर्णयामुळे सर्व ठिकाणी समाधान व्यक्त होत आहे.



# पनवेल ट्रेकर्स ग्रुपतर्फे १०२ झाडांचे वृक्षारोपण



**दै.रायगड नगरी । पनवेल**

वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंहजी यांच्या ४८१ व्या जयंतीचे औचित्य साधून पनवेल येथील आदई डोंगरावर पनवेल ट्रेकर्स या ग्रुप तर्फे १०२ जंगली झाडे लावण्यात आली. ह्या वेळेस २० सभासदांनी भाग घेतला.

पनवेल ट्रेकर्स तर्फे पनवेलच्या पर्यावरणाचा तोल सावरन्याचा एक छोटासा प्रयत्न केला. झाडे लावणे जेवढे महत्त्-ाचे आहे त्यापेक्षा ते टिकवणे व जगवणे गरजेचे आहे. या डोंगरावर आधीपासूनच असणाऱ्या झाडांना आम्ही कडक उन्हाळ्यात खूप कष्ट करून पाणी घातले. आपल्या मृत्यू नंतर ही झाडे निसर्गाला वाचवतील असे मत श्री राजपूत करणी सेना महाराष्ट्रचे उपाध्यक्ष व पनवेल ट्रेकर्स चे संस्थापक गणेशसिंह राजपूत यांनी केले. या कार्यास अविनाश मिंड, हेमंत वाणी, नामदेव शिंपी समाज युवक संघाचे रायगड जिल्हाध्यक्ष नागेश हिरवे, राजेश जाधव, अतुल पोतदार, राहुल कुरील, डॉ.राम वर्मा, आनंद सावंत, सचिन वैद्य, ढेबे साहेब, मनी सर, विजय बागुल, सौ. संघमित्रा राजपूत, सौ. मनीषा मिंड, आर्या पोतदार, अनुष्का सावंत आणि बच्चे कंपनी यांचे विशेष सहकार्य लाभले.

# साई सहारा प्रतिष्ठान पेणच्या अत्याधुनिक रुग्णवाहिकेतून दोन महिन्यात २०० रुग्णांना विनामूल्य सेवा

**दै.रायगड नगरी । पेण**

मुंबई-गोवा महामार्गावर अपघातग्रस्तांना मागील सोळा वर्षांपासून विनामूल्य सेवा देणारा पेण येथील कल्पेश ठाकूर आता कोरोना रुग्णांसाठी देखील विनामूल्य सेवा देत असल्याने त्यांच्यासाठी देखील देवदूत ठरत आहे.

कोरोना महामारीने मागील वर्षीपासून संपुर्ण जगात थैमान घातले आहे. आज या सांसर्गिक रोगाने नाती दुरावली, गाव दुरावले असे चित्र सगळीकडे पाहायला मिळत आहे. आपले-आपले म्हणणारे देखील या कोरोनाच्या भीतीने लांब गेले. कोरोनाग्रस्त रुग्णाकडे सगळे पाठ फिरवत असतानाच या रुग्णांसाठी मोफत रुग्णवाहिका सेवा देण्यासाठी कल्पेश पुढे आला आहे. मुंबई- गोवा महामार्गावर अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी नेहमीच पुढाकार घेतलेल्या कल्पेश ने कोरोनाच्या लढाईत देखील आपले विनामूल्य सेवेचे व्रत कायम ठेवले आहे.




मुंबई-गोवा महामार्गावर अपघातग्रस्तांची विनामूल्य मदत करणाऱ्या कल्पेश ठाकूर यांच्या साई सहारा प्रतिष्ठान पेणच्या अत्याधुनिक रुग्णवाहिकेचे लोकार्पण एप्रिल महिन्यात रायगड जिल्हाधिकारी निधी चौधरी व अन्य मान्यवरांच्या हस्ते झाल्यानंतर फक्त जवळपास दोन महिन्याच्या कालावधीत २०० हुन अधिक कोरोना बाधित रुग्णांना पेण ते अलिबाग, पनवेल, नवी मुंबई, मुंबई, कर्जत येथे कोणताही मोबदला न घेता रुग्णालयांत विनामूल्य सेवा देण्याचे कार्य अविरत सुरूच आहे. आपला हॉटेल व्यवसाय सांभाळत असतानाच कोरोना ग्रस्तांच्या मदतीला कल्पेशने नेहमीच धाव घेतली आहे. गाडीत लागणार डीझल असो किंवा चालकाचा पगार व गाडीचे छोटे-मोठे काम असो कल्पेश स्वतःच्या खर्चाने करत आहे. एखादे वेळी रुग्णवाहिकेवर चालक नसला तरी स्वतः चालकाची भूमिका निभावून रुग्णाला सेवा देण्याच्या या कार्याचे देखील सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

मुंबई-गोवा महामार्गावर विनामूल्य सेवा देण्याच्या 'कल्पेश च्या या कार्याची दखल घेऊन त्याला रायगड भूषण पुरस्कारा बरोबरच देवदूत सारखे अनेक शासकीय तसेच सामाजिक संस्थांनी कल्पेश ठाकूरचा सन्मान केला आहे. अपघातग्रस्त व कोरोनाग्रस्ताला मदत लागल्यास ९२२५७१४५५५ या मोबाईल नंबर वर तातडीने संपर्क साधण्याचे आवाहन कल्पेश ने केले आहे.

# चालकाच्या निष्काळजीपणामुळे ट्रेलरच्या अपघातात क्लिनरचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जेएनपीटी येथून पाताळगंगा येथे जाणाऱ्या चालकाने पळस्पे फाटा येथील वळणावरुन भरधाव वेगात ट्रेलर चालवून नेल्याने सदरचा ट्रेलर ब्रिजवरुन पलटी होऊन खाली पडल्याने झालेल्या अपघातात ट्रेलरवरील क्लिनर गंभीर जखमी होऊन मृत झाल्याची घटना घडली. या अपघातानंतर सदर ट्रेलर चालक पळुन गेला असुन पनवेल शहर पोलिसांनी त्याचा शोध सुरु केला आहे.

या अपघातातील पळुन गेलेल्या ट्रेलर चालकाचे नाव अब्दुल सोहरब खान (३०) असे तर त्याच्या सोबत असलेल्या क्लिनरचे नाव हासम सत्तार खान (३२) असे आहे. हे दोघेही मुळचे हरियाणा राज्यातील असून रविवारी मध्यरात्री हे दोघेही जेएनपीटी येथून मालवाहू कंटेनर घेऊन पाताळगंगा येथे जात होते. पहाटे पावणे तीन वाजण्याच्या सुमारास त्यांचा ट्रेलर ज्या पनवेल-पुणे मार्गावरील कोळखे गावाजवळच्या पळस्पे फाटा येथील ब्रीजवर आला असताना, ट्रेलर चालकाने भरधाव वेगात ब्रिजवरील वळणावरुन आपले वाहन नेले.

त्यामुळे ट्रेलरवरील चालकाने नियंत्रण सुटल्याने सदरचा ट्रेलर ब्रिजवरुन खाली कोसळला. सदरचा ट्रेलर क्लिनरच्या बाजुने खाली पडल्याने यात क्लिनर हसम सत्तार खान हा गंभीर जखमी झाला. यावेळी ट्रेलर चालक क्लिनरला वैद्यकिय मदत मिळवून न देता, तसेच सदर अपघाताची माहिती न देता त्याठिकाणावरुन पळून गेला. या अपघाताची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळाल्यानंतर त्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन अपघातात जखमी झालेल्या क्लिनरला रुग्णालयात नेले. मात्र तेथील डॉक्टरांनी त्याला मृत घोषीत केले.

या अपघातात ट्रेलर चालकाने निष्काळजीपणे ट्रेलर चालविल्यामुळे सदरचा अपघात झाल्याचे आढळुन आल्याने पनवेल शहर पोलिसांनी ट्रेलर चालक अब्दुल सोहराब खान याच्यावर गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

# सुधागड तालुक्यातील खरेदी विक्री झालेल्या आदिवासींच्या जमिन व्यवहाराची होणार चौकशी

## माहिती अधिकार कार्यकर्ते विजय यादव यांच्या पाठपुराव्याला यश

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सुधागड तालुक्यातील आदिवासींच्या जमिनी व्यवहारात गोंधळ झाल्याची तक्रार माहिती आधिकार कार्यकर्ते विजयकुमार श्रीरंग यादव यांनी केली होती. त्या अनुषंगाने तालुक्यातील आदिवासींच्या जमिनी खरेदी व विक्री व्यवहारची चौकशी करण्याचे आदेश सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी नुकतेच जिल्ह्यातील सर्व सहाय्यक दुय्यम निबंधक वर्ग २ व दुय्यम निबंधक श्रेणी-१ यांना दिले आहेत.

सुधागड तालुका आदिवासी बहुल म्हणून ओळखला जातो. जिल्ह्यासह सुधागड तालुक्यातही आदिवासी बांधवांच्या हक्काच्या जमिनी आहेत. मात्र या जमिनी बिगर आदिवासींना कवडीमोल किंमतीला विकल्या जात आहेत. हे हस्तांतरण रोखण्यासाठी सुधागड तालुक्यातील अदिवासी बांधवांनी पुढाकार घेतला आहे. आम्हाला न्याय मिळून द्याव यासाठी या संदर्भातील निवेदने माहिती आधिकार कार्यकर्ते विजयकुमार श्रीरंग यादव यांना देण्यात आले होते. या निवेदनाच्या अनुषंगाने माहिती अधिकार कार्यकर्ते विजयकुमार यादव यांनी राज्याचे मुख्यमंत्री, महसुल मंत्री व उपमुख्यमंत्री रायगड जिल्हा यांच्याकडे तक्रार व चौकशीची मागणी केली होती.

विजयकुमार यादव यांनी दिलेल्या निवेदनाची दखल घेऊन सुधागड तालुका स्तरावर दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये आदिवासी जमीन खरेदी विक्री दस्त नोंदणी झाली आहे. त्याची मागील पाच वर्षाची दस्तनोंदणी सखोल तपासणी व चौकशी करण्याचे आदेश मुंबई मंत्रालय, महसूल मंत्री व महसूल विभागाने सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी यांना दिले आहेत. त्यानुसार या कार्यालयाने शासन नियम व प्रचलित धोरणानुसार आवश्यक त्या नियमात उचित कारवाई करून केलेल्या कारवाईचा अहवाल कार्यालयात सादर करावा असे आदेश रायगड जिल्ह्यातील सर्व सहाय्यक दुय्यम निबंधक वर्ग २ व दुय्यम निबंधक श्रेणी-१ जिल्हा रायगड यांना दिले आहेत.

विजयकुमार यादव केलेल्या मागणीची चौकशी सुरु झाल्याने अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे कोकण संघटक रमेश पवार यांनी विजयकुमार यादव यांचे आभार मानले आहेत. तसेच आमच्या अदिवासी बांधवांची फसवणूक झाली आहे. त्यांना न्याय मिळावे अशी भावना व्यक्त केली आहे.